IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# किराना घराण्याच्या जेष्ठ चिंतनशील गायिका डॉ.प्रभा अत्रे.

डॉ.एस.व्हि.कड

संशोधक

डॉ.भोजराज चौधरी

मार्गदर्शक

सारांश :–

डॉ.प्रभा अत्रे या किराना घराण्याच्या गायिका आहेत. डॉ.प्रभा अत्रे यांनी संगीत विषयात आकरा पूस्तके प्रकाशित करण्याचा जागतिक विक्रम केला आहे. डॉ.प्रभा अत्रे यांनी 18 एप्रिल 2016 रोजी इंडिया हॅबिटॅट सेंटर नवी दिल्ली येथे हिंदी आणि इग्रंजी मध्ये संगीतावरील 11 पूस्तकांचे प्रकाशन केले. डॉ.प्रभा अत्रे या अग्रगण्य हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायिकापैकी एक म्हणून गणल्या जातात. डॉ.प्रभा अत्रे या पंडीत सुरेशबाबू माने आणि गानहिरा हिराबाई बडोदे कर यांच्या शिष्य आहेत. भारत सरकारने डॉ.प्रभा अत्रे यांना संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल 1990 मध्ये पद्मश्री आणि 2002 मध्ये पदमभूषण पूरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.प्रभा अत्रे यांना 2022 मध्ये पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला. हा सन्मान भारतरत्न नंतर सर्वोच्च नागरी आहे. प्रतिभावंत गायिका,संगीत,रचनाकार,लेखिका प्राध्यापिका व विदूषी म्हणून डॉ.प्रभ अत्रे यांचा लौकीक असलेला दिसून येतो ख्याल गायिका सोबत ठुमरी,दादरा, गझल उपशास्त्रीय संगीत नाटयसंगीत भजन व भाव संगित गायकीवरही त्यांचे प्रभूत्व असलेले दिसुन येते. भारतीय शास्त्रीय संगीतीचा जगभर प्रसार करण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. आपल्या कार्यक्रमात त्या अनेकदा स्वत: रचलेल्या बंदिशी सादर करतात. त्यांच्या काही रचना जसे मारु बिहाग रागातील जागू मै सारी रैना कलावती रागातील तन मन धन किरवाणी रागातील नंद नंदन ध्या श्रोतृवृंदाच्या विशेष पंसतीच्या रचना असलेल्या दिसून येतात.

प्रस्तावना :

डॉ.प्रभा अत्रे यांनी तरुण वयात संगीत शारदा संगीत विद्याहरण,संगीत सशंयकल्लोळ, संगीत मृच्छ कटिक, बिरज बह लिलाव या सारख्या संगीत नाटका मध्ये प्रमुख स्त्री भूमिका केल्या. डॉ.प्रभा अत्रे या 1955 पासून देशोदेशी आपले गायनाचे कार्यक्रम सादर करत आहेत. भारताच्या व विदेशातील अनेक ख्यातनाम व महत्वपूर्ण संगीत महोत्सवांमध्ये त्यांचे कार्यक्रम सादर झाले आहेत. डॉ.प्रभा अत्रे यांचे आई–वडील शिक्षक असल्यामुळे घरची परिस्थीती बेताचीच होतो आपल्या मूलीने डॉक्टर झाले पाहिजे अशी त्यांच्या आई वडीलांची इच्छा होती. पण वसतीगृहात एकटीने राहण्याची तयारी नसल्यामुळे त्यांना डॉक्टर होण्याचा नाद सोडावा लागला. शेवटी विज्ञान शाखेतील पदवी सपांदन करुन नंतर त्यांनी कायदयाचे शिक्षण घेतले. खरे तर घरात संगीताची कुणालाच फारशी आवड नव्हती संगीत घरात शिरले ते अपघातानेच आईच्या आजारपणामुळे घर बेजार झाल्यामुळे कुणी तरी त्यांना पेटी शिकण्याचा उपाय सुचविला. आईच मन त्यात रमलं नाही पण लेकीन मात्र सुर पकडला. आणि आयुष्यभर सुरांनीही प्रभाताईना उत्तम साथ दिली. सुरुवातीच्या काळात विजय करंदीकराच्या शिकवणूकीतून पभाताईना सुरांची ओळख झाली. रागांशी परिचय झाला ताल समजू लागला आणि ख्याल बुमरी,नाटयगीत,भवगीत यासारखे सर्व गानप्रकार त्या मैफीलीमधून गाऊ लागल्या.

प्रभाताईनी अपूर्व कल्याण,मधूर कंस पटदिप,मल्हार तिलंक भैरव, भीमकली रवीभैरव या सारख्या नव्या रागाची रचना केली आहे. तसेच किराना घराण्याच्या गायकीत त्यांनी प्रथमच टप्पा गायनाचा परिचय करुन दिला. रंगमंचावर गाण्याचा प्रभावी अविष्कार कसा करावा त्याचे तंत्रे त्यांनी हिराबाई बुडोदेकर यांच्या कडून आल सात केले. माननीय डॉ.प्रभा अत्रे यांनी संगीत शारदा, संगीत विद्या हरण, संगीत संशय कल्लोळ संगीत मृच्छ कटीक बीरजबहू लीलाव या सारख्या संगीती कामध्ये प्रमूख स्त्री भूमिका केल्या होत्या.

किराना घराण्याची विशेषता :–

1. किराना घराणे मूलतः बीन्, वीणा, सारंगी वाद्यावर आधारलेले, संथगतीचे स्वरालापांचे, स्वरांच्या कल्पकतेचे स्वर विश्व निर्माण करणारे स्वरप्रधान, आलापप्रधान घराणे आहे. खर्ज स्वराची भरदार पायाभरणी, मन्द्रसप्तकात भरपूर स्वरविलास करीत करीत मध्यषड्जाभोवती स्वरांची कल्पक, रंजक व हर प्रकारांच्या स्वरकल्पनांची आलापचारी फुलत ठेवून षड्जावर स्थिरावते, एक एक स्वरांचा सूक्ष्मतम आनंद घेत घेत एखाद्या

विशाल वृक्षाप्रमाणे, चोफेर गायकी बहरत जाते. तार षड्ज लावण्याची, त्यावर स्थिरावण्याची सुध्दा एक खासियत असते.

2. आवाज स्वच्छ खुला अत्यंत सुरेलपणाने लावला जातो. सुरेलपणाकडे ह्या घराण्याचा खुपच कटाक्ष असतो. स्वरस्थाने, श्रृतिज्ञान, स्वरलगाव, अचूक स्वर फेक आणि हमखास आवाजीची किमया साधण्याकरता आवजाची तसच गायकीची तयारी केली जाते. स्वच्छ आकारयुत्क आवाज लावण्याकडे कल असल्यामुळे आवाजातील दोष कळतात, त्या त्या रागातली स्वरस्थाने अचूक लागतात. बोल आलाप–लाल लयीची झटापट आणि स्वरप्रधान आलापचारीचा भरपूर आनंद घेतला जातो.

3. विलंबित खालाची लय ढाली (संथ) ठेवतात. तिलवाडा, एकताल, झूमरा, झपताल इत्यादी तालात विलंबित ख्याल आळवून त्याच रागातल्या मध्यद्रुत लयीतच छोटयाख्यालाची चीजेची देतात. पूर्ण बंदीश अस्ताई – अंतरा रेचीव लयबध्द मांडून संथ शांत, अहिस्ते आलापचारी करतात. मींड, स्वरसंगती गमक, कणस्वरप्रयोग पध्दतशीर केले जातात. अतिविलंबित लयीच्या आलापींमुळे कुठेही धावपळ, घईगर्दी नसते. स्वस्थतेचा व शांततेचा सुखद अनुभव किराना घराण्याच्या गायकीतून प्रविष्ट होतो.

4. बहुदा प्रचलित राग, स्वयंभू राग गाण्याकडे कल अधिक असतो. सर्वसामान्यांना कळणारे राग असतात, स्वरविलास–आलापचारीलाही भरपूर वाव मिळतो आणि रसिकांच्या डोक्यावरुन गायकी न जाता रसिकांच्या हृदयात शिरते रसभावविश्व निर्माण होते. प्रचलित राग, साधे ताल सरळ ठेका अन् मंत्रमुग्ध स्वरप्रधानता्.

5. अब्दुल करीमखां साहेब यांची गोबरहरी बानी होती. ते श्रुति व स्वरांना वेष्टून बीन अंगाने अत्यंत सुरेल गात असते. तानाही भरदार, दाणेदार, लांबपल्याच्या गमकांच्या जबरदस्त तयारीच्या घेत असते. ते ठूमरी गात असते. करुणरसप्रधानता ह्या घराण्याची शैली आहे. ख्यालाला जोडून ठुमरी अधिकाराने गायली जाते. ह्या घराण्यात स्वर विलासाचा पुरेपूर प्रत्यय ख्यालात, ठुमरीत येतो.

6. नोटशन (स्वरावली) प्रकार खास ढंगाने म्हणण्याची किमया ह्या घराण्यातल्या कलावंतांमध्ये आढळते. अब्दुलकरीमखांसाहेब नोटेशन घेण्यात तसेच कर्नाटकी ढंग दाखविण्यात निष्णांत होते.

काही दक्षिणात्य राग उत्तर हिंदुस्थानी पध्दतीत प्रचारात आणले. उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत ह्या घराण्याचे साम्राज्य पसरलेले आहे.

डॉ.प्रभाअत्रे एक ख्यातनाम व्यक्तिमत्व

संगीत क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्तिमत्व डॉ. प्रभा अत्रे यांनी त्यांचे उत्कृष्ट विचारवंत, सादरीकरण करणारा कलाकार, संगोतकार आणि उत्कृष्ट संगीत शिक्षक म्हणून स्थरान निर्माण केले. त्या त्यांच्या काळातील सर्वात मानाचा आणि देशातील किराणा घराण्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या श्रेष्ठ गायीकी आहेत. त्या विज्ञान व विधी शाखेतील पव्दीधर असुन संगीतात आचार्य पव्दीने सन्कानित केल्या गेल्यात. एक आपचारीक सहायक निर्मिती म्हणून ।सस प्दकपं ट्रंकपव वर प्राध्यापक आणि संगीत विभाग प्रमुख छक्ज ॅवउमदश्े न्दपबमतेपजल डनउइंप आणि शास्त्रीय संगीताला समार्पित स्वरश्री रेकॉडि कंपनीच्या निर्माता आणि दिग्दर्शीका आहेत. डॉ. प्रभा अत्रे यांच्याकडे नविन उपक्रम आणि सतत प्रयात्न करण्याची शत्की असल्यामुळे त्या इतर गायिकांपेक्षा वेगळया आहेत.

डॉ. प्रभा अत्रे यांच्या कडें डॉ.प्रभा अत्रे फांउडेशन ज्याचे उद्दिष्ट भारतीय शास्त्रीय संगीतसाठी आणि सदरीकरण कलेसाठी प्रयत्न करणे आहे. त्यांनी स्वरमयी गुरुकुज सुध्दा स्थापन केले ज्याचे उदिष्ट शाळा महाविद्यालयातील आणि पारंपारिक गुरु शिष्य परंपरा यांच्या मधिल कमकुवत बाजुला मजबुती देवून गुणी हुशार विद्यार्थांना व्यावसायिक कलाकार हा आहे.

डॉ.प्रभा अत्रे यांचे मुख्यत्वे आजच्या सादरीकरणावर अनेक पुस्तके प्रमाणीत केले ओ त्यांच्या आचार्य पव्दीचा प्रबंध सरगम किंवा जवाचा उपयोग सांगीतीक साहित्य म्हणून वापर करण्याऱ्याळया पाहिल्या शपथपूर्ण कामकरनाऱ्या प्रथम संशोधिका आहेत.

त्यांचे प्रथम पुस्तक स्वरामयी जे त्यांच्या अनेक प्रकारच्या संगीतावर आधारित लेखांचे संकलन आहे. जे महाराष्ट्र शासनाने 1989 मध्ये शास्त्रीय संगीताबद्दलचे केले. द्वितीय पुस्तक स्वराली 1992 मध्ये प्रकाशन होवून सन्मानित झाले. मध्यप्रदेश शासनाने दोन्ही ग्रंथाचे हिंदीत भाषांतर करुन हिंदी ग्रंथ अकादमीच्या माध्यामातुन वाचकांसमोर ठेवले आणि उपशास्त्रीय प्रकारच्या रचना आहेत 1994 मध्ये प्रकाशित झाले. म्दहसपेजीसमपदह जीम सपेजमदमत ब्वदजमउ.च्वतंतल छवतजी प्दकपंद ब्सेंपबंस टवबंस डनेपब च्मतवितउंदबमश ।दक ।सवदह ूपजी जीम चंजी वि डनेपब या इंग्रजी पुस्तकाच्या माध्यमातुन भारतीय संगीत कला समण्यासाठी व आत्मभास करण्यासाठी मदत

झालेली आहे. एक राठी कविता संग्रह सुध्दा अंतस्वर प्रकाशित आहेत अश्याप्रकारे ताईंच्या व्यत्किमत्वाचे विविध पैलु आहेत.

डॉ.प्रभा अत्रे ह्या कला सादरीकणाच्या आणि संशोधनाच्या उत्साहाने स्वागत करणाऱ्या गुरु आहेत मध्यप्रदेश शासनाने दोन्ही ग्रंथाने हिंदीत भांषांतर करुन हिंदी ग्रंथ अकादमोच्या ताईंचे काही विद्यार्थी अधिच विख्यात प्रसिध्दी प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. संशोधन करणाऱ्या काही विद्यार्थ्यांना त्यांच्या समकालीन कला प्रदर्शनाच्याआणि त्यांच्या कार्याच्या संदभ म्हणून फायदा होतो. दुरदर्शन पाच्श्रात्य विद्यापीठामध्ये त्यांनी टपेपजपदह च्तवमिबमत म्हणून कार्य केले. द्रदर्शन आकाशवाणी आणि स्मबजनतम क्मउवेजतंजपवद या सारखे कार्यक्रमाचा रसीकांनी भारपूर आस्वाद घेतलेला आहे.

कामगीरी आणि संगीता या मध्ये घालवलेल मोठा कालावधी त्यांनी दिलेला आहे. पद्मश्री पुरस्काराने 1990 मध्ये आणि पद्मभुषण पुरस्काराने 2002 मध्ये भारताच्या राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित झाल्यात. भारत सरकारने ताईंना वृध्दींगत आणि प्रसिध्द करण्यासाठी संगीत नाटक अकादमी हा पुरस्कार 1991 मध्ये प्रदान केला आहे. कालीदास पुरस्कार 2004 मध्ये तर मध्यप्रदेश मध्ये उपवादात्मक कामगीरी, अति उत्कृष्ट कला, अप्रतिम डॉ.प्रभा अत्रे यांच शिक्षण गुरु शिष्य परंपरेनुसार सुरेशबाबु माने व त्यांची बहिन हिराबाई बडोदेकर दोनही किराणा घराण्याचे प्रख्यात गायक यांच्या कडे झाले. आणि प्रसिध्द संगीतकार अमीर खान आणि बडे गुलाम आली यांच्या कडून ताईनी घेतले. प्रभाताईंची सभ्यता, संवेदनात्मकता आणि स्पष्टता यांचे दर्शन त्यांच्या विचारातुन व गाण्यातुन दिसुन येते. ख्याल, तराणा, ठुमरी, दादरा, गझल किंवा भजन गाण्यामधील वेगळया पध्दती आणि विशिष्ट कल्पकता आणि सादरीकरण दिसुन येते. त्यांचे आनंददायी आणि आरपुर्वक मंचकावर असणे त्यांचे निदोष जुहवून घेणारा संपक त्यांच्या कल्पक प्रयोग सोगतच चाणाक्ष्य बुध्दी, उच्चार, गतीमान, प्रेरक प्रयत्न न करता आलेला ताबा मनाला घेवुन जाणारे अलोंर तान आणि सरगम, शब्दांना साजेबाजपणा प्रेरणादयी शब्दवित्र आणि भावनात्मक गोष्टी ह्या सर्व बाबींमुळे समाधानकारेक अनुभव येतो.

संदर्भ सुची.


1. महाराष्ट्र टाईम्स दिनांक 24 मार्च 2018
2. महाराष्ट्र टाईम्स दिनांक 12 संप्टे 2021

3- wwwLokmat.com

4- Marathi.abplive.com

5- www.esakal.com

6- www.marathisrushti.com